'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (GIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 182 (A)- Contemporary Innovation in Language & Literature
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

# लोकसंख्या शिक्षणाची गरज आणि नागरिकांची भूमिका

डॉ.रमेश वि. मोरे
स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान
महाविद्यालय.रिसोड जि.वाशिम

## प्रास्ताविक :–

लोकसंख्येची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. लोकसंख्या विस्फोट ही जगातील अनेक विकसनशील देशांना भेडसावणारी समस्या आहे. नव्याने स्वतंत्र झालेले अनेक देश विकासाकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न करीत आहेत परंतु झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे त्यांचे प्रयत्न फारसे यशस्वी होत असल्याचे दिसत नाहीत. लोकसंख्यावाढीची ही समस्या सोडविण्यासाठी कुटुंब कल्याणाचे विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्याचबरोबर नव्या पिढीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टीकोन व जाणीवा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. उत्तम जीवनमानाकडे वाटचाल करण्यासाठी लोकसंख्या शिक्षण आवश्यक आहे.

## लोकसंख्या शिक्षणाचा अर्थ :–

लोकसंख्या शिक्षण हा एक प्रचारात्मक कार्यक्रम नसुन एक शैक्षणिक कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात कुटुंब, समाज, राष्ट्र व जग यामधील लोकसंख्येचा अभ्यास समाविष्ट आहे. लोकसंख्या शिक्षणात लोकसंख्येच्या स्थितीतील बदल आणि त्या अनुषंगाने देशातील नागरिकांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनावर होणारा परिणाम यांचे विवेचन असते. जीवनातील सर्वच क्षेत्रांतील नियोजन हे व्यक्ती व समाज या दोघांनाही उपयुक्त व इष्ट आहे याची भावी पिढीला जाणीव करुन देणारा प्रेरणात्मक कार्यक्रम म्हणजे लोकसंख्या शिक्षण होय. लोकसंख्येचे स्वरुप व लोकसंख्याबदलाचे विविध क्षेत्रांतील परिणाम याचे ज्ञान संपादन करण्यासाठी केलेले अध्ययन अध्यापन म्हणजे लोकसंख्या शिक्षण होय.

लोकसंख्या शिक्षणात देशातील लोकसंख्येचा आकार, वाढ, लोकसंख्येची रचना व त्यातील बदल, उपलब्ध साधन संपत्ती, आर्थिक व औद्योगिक प्रगती, इत्यादींमध्ये असणाऱ्या परस्पर–संबंधांचे आकलन करुन द्यावयाचे असते. लोकसंख्या शिक्षण हे केवळ लोकसंख्येच्या सांख्यिकी माहितीपूरते मर्यादित नसुन त्यात लोकसंख्येत येणाऱ्या सर्व घटकांतील संबंधांचा अभ्यास व त्याला पोषक अशी उपाययोजना कशी करावी याचे विवेचन अभिप्रेत आहे. अशा प्रकारे लोकसंख्या शिक्षण ही व्यापक संकल्पना आहे. त्यात लोकसंख्येची संख्यात्मक व गुणात्मक अशी दोन्ही स्वरुपे समाविष्ट आहेत.

लोकसंख्या शिक्षणात संयुक्त राष्ट्र संघटना तसेच विविध आंतरराष्ट्रीय संघटना यांच्या चर्चेतून खालील गोष्टींचा समावेश आढळतो.

१)हा एक शैक्षणिक कार्यक्रम असून शिक्षणार्थींना लोकसंख्येतील बदल, विकास आणि मानवी जीवन यांतील संबंध स्पष्ट करुन देणे.
२)सांप्रतच्या व उद्याच्या मानवी जीवन विकासाबाबतची जाणीव निर्माण करुन देणे.
३)लोकसंख्येच्या समस्येकडे संशोधन दृष्टीने पाहण्याचा दृष्टीकोन निर्माण करणे.
४)लोकसंख्या शिक्षण हे मूल्याधारीत असल्यामूळे मुल्यांचे विवरण करण्यास मदत करुन त्यांच्या सामाजिक जीवनावरील परिणामांची जाण निर्माण करणे आणि पर्याय सुचविणे.
५)लोकसंख्या शिक्षणात लोकसंख्याशास्त्र व लोकसंख्या अभ्यास यातील योग्य घटकांचा समावेश करणे.

ISSN : 2348-7143
April-2019

६)कुटुंब नियोजन आणि लैंगिक शिक्षण यांतून सुजाण नागरिकत्व निर्माण करणे.
७)कुटुंब शिक्षणाव्दारे जबाबदार पालकत्वाबाबत जाणीव निर्माण करणे.

**लोकसंख्या शिक्षणाची उद्दिष्टे :—**

लोकसंख्या शिक्षणाची संकल्पना उद्दिष्टरुपात मांडल्यास ती अधिक स्पष्ट होईल. लोकसंख्या शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे पूढीलप्रमाणे सांगता येतील.

१.जीवनमानावर परिणाम करणारे घटक त्यांचा परस्परसंबंध व त्यामधील परिवर्तनाची प्रक्रिया यांचे ज्ञान मिळविण्यास मदत करणे.

२.जीवनमान ठरविण्यास जबाबदार असलेल्या घटकांत चांगल्या दिशेने परिवर्तन घडवून आणण्यासाठी योग्य क्षमता, जाणीव व कौशल्ये निर्माण करण्यास मदत करणे.

३.प्राप्त ज्ञान, जोपासलेली मूल्ये, आत्मसात केलेली कौशल्ये व क्षमता यांच्या आधारे देशाचा आदर्श भावी नागरीक घडविणे.

४.स्वतःच्या कुटुंबासंबंधी योग्य व समाजाच्या दृष्टीने हितकारक निर्णय घेण्यासाठी पात्र बनविण्यास मदत करणे.

भारतात इतर घटकांच्या मानाने लोकसंख्येचा आकार हा घटक खूपच वाढत आहे. लोकसंख्येच्या स्थितीत अनिष्ट दिशेने परिवर्तन होत आहे. त्यामूळे आपले जीवनमान खालावत आहे. ही स्थिती बदलण्यासाठी लोकसंख्या शिक्षणाची गरज आहे.

**लोकसंख्या शिक्षणाची व्याप्ती :—**

लोकसंख्या शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लोकसंख्या शिक्षणात पुढील गोष्टींची समावेश केला जातो.

१.लोकसंख्येत घडणारे परिवर्तन आणि लोकसंख्येतील संख्यात्मक बदल तसेच लोकसंख्येच्या रचनेत घडून येणारी गुणात्मक सुधारणा यांना प्रगतीच्या दृष्टीने असलेले महत्व.

२.लोकसंख्येचा साधनसंपत्तीवर होणारा परिणाम, साधनसंपत्तीवरील मर्यादा व साधनसंपत्तीचा काटकसरीने उपयोग करण्याची आवश्यकता.

३.लोकसंख्येची व आर्थिक तसेच शैक्षणिक प्रगतीची आणि श्रमिकांच्या कार्यक्षमतेत वाढ घडवून आणण्याची आवश्यकता.

४.साधनसंपत्ती व आर्थिक आणि औद्योगिक प्रगती यांचा संबंध व मानवरुप साधनसंपत्तीच्या विकासाचे महत्व

५.लोकसंख्येचा व सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीचा संबंध तसेच सामाजिक व सांस्कृतिक दर्जा सुधारण्यासाठी नैतिक मूल्ये जोपासण्याची आवश्यकता.

६.लोकसंख्या व पर्यावरण यांचा संबंध व मानवी अस्तित्वासाठी पर्यावरणातील समतोल राखण्याची आवश्यकता. वरील बाबींवरुन लोकसंख्या शिक्षणाची व्याप्ती लक्षात येईल.

**लोकसंख्या शिक्षण आणि कुटुंबनियोजन :—**

लोकसंख्या शिक्षणाची कल्पना कुटुंबनियोजन संस्थेच्या प्रयत्नांतून उदयास आली. परंतु लोकसंख्या शिक्षण म्हणजे कुटुंबनियोजनाचे शिक्षण नव्हे. लोकसंख्यावाढीवर नियंत्रण, जन्मदरात घट, जननक्षमतेवर निबंध यांचा समावेश कुटुंबनियोजन कार्यक्रमात होतो. कुटुंब नियोजन हा कार्यक्रम आरोग्य सेवेचा एक कार्यक्रम म्हणुन राबविला जातो. त्यामुळे कुटुंबनियोजन हा कार्यक्रम बराचसा व्यापक आहे. त्यात विविध घटकांवर भर दिला

जातो. उदा. जनन आरोग्य, प्रजोत्पादनक्षमता, कुटुंबकल्याण, कुटुंब नियोजनाची साधने, लसीकरण, कुटुंबनियोजन धोरण व पध्दती, बाल आरोग्य व बालसंगोपान इत्यादी. कुटुंबनियोजन म्हणजे कुटुंबाचा विकास व त्याचे नियोजन होय.

लोकसंख्या शिक्षण हे कुटुंबनियोजन कार्यक्रमापेक्षा खूपच व्यापक आहे. भावी पीढीला जबाबदारीची जाणीव करुन देण्यासाठी लोकसंख्या शिक्षण हा एक शैक्षणिक उपाय आहे. लोकसंख्या शिक्षण लोकसंख्या वाढीने निर्माण झालेल्या समस्यांबद्दल जाणीव निर्माण करते. आपल्या कुटुंबाच्या आकाराविषयी परिणामांचा विचार करुन तर्कशुद्ध निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करते. लोकसंख्येचे परिणाम व रचना यांचा आणि जीवनमानावर परिणाम करणाऱ्या घटकांचा विचार करण्याच्या दृष्टीने विवाहपूर्व योग्य त्या जाणीवा आणि जागरुकता, क्षमता आणि कुवन निर्माण करण्याचा प्रयत्न लोकसंख्या शिक्षणात केला जातो.

लोकसंख्या शिक्षण व लैंगीक शिक्षण :-

लैंगिक शिक्षण हा एक लोकसंख्या शिक्षणाशी संबंधित विषय असल्यामुळे त्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे व त्यासाठी विविध माध्यमांचा वापर करुन, विशेषत: दृक् श्राव्य फिती तयार करुन हे ज्ञान देणे सुलभ होईल. गेल्या काही दशकांमध्ये सामान्य लोकांमध्येही निर्माण झालेली विकासाची आकांक्षा व वाढत्या लोकसंख्येमुळे त्यावर पडणाऱ्या मर्यादा, त्यातून निर्माण होणारे आर्थिक व सामाजिक प्रश्न या सर्वांमुळे लोकसंख्या शिक्षण तसेच लैंगीक शिक्षण देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. सुरुवातीस लैंगिक शिक्षणास बराचसा विरोध होता. गेल्या काही वर्षामध्ये एड्सच्या प्रचाराची भयानकता दिसल्यानंतर लैंगिक शिक्षणाचे महत्व सर्वत्र पटले.

लोकसंख्या शिक्षणात नागरिकांची भूमिका :-

लोकसंख्या वाढ या समस्येची जाणीव निर्माण करण्यात आणि लोकसंख्या धोरणाच्या संदर्भात चांगली वृत्ती विकसीत करण्यात भारतीय नागरीकांना महत्त्वाची भूमिका बजावायची आहे. त्यासाठी प्रथम त्याला या बाबतील जाणीव झाली पाहीजे. लोकसंख्या शिक्षणाची उद्दिष्टे सतत डोळ्यासमोर ठेऊन ती अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न केला पाहीजे. लोकसंख्येची, गतिमानता, लोकसंख्येची रचना, लोकसंख्यावाढीची कारणे, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्या यांचे सम्मक ज्ञान प्रत्येक नागरीकाने आत्मसात केले पाहीजे.

प्रत्येक नागरीकाचा लोकसंख्याविषयक दृष्टीकोन तयार होण्यासाठी महाराष्ट्र राज्य आरोग्य, शिक्षण विभाग व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या संयुक्त उपक्रमांतुन तयार झालेल्या जाणीव पत्रिकेतील खाली नमूद केलेल्या गोष्टी करण्याची भूमिका प्रत्येकाने पार पाडली पाहीजे.

१.लोकसंख्यावाढ व साधनसामग्री यांचा मेळ साधला नाही तर जीवनमान खालावेल याची जाणीव ठेवणे.
२.जाती, धर्म, भाषा, लिंग हे भेद विसरून सर्वजण सहकार्याने व कष्टाने काम करणे.
३.मुलाने २१ वर्षे वयाच्या आत व मुलीनें १८ वर्षे वयाच्या आत विवाह करणे कायद्याने गुन्हा आहे हे लक्षात ठेवून त्याचे पालन करणे.
४.देशाची साधनसंपत्ती वाढवू आणि असलेल्या साधनसंपत्तीचा काटकसरीने उपयोग करणे.
५.शासनाला लोकसंख्या शिक्षणाच्या कार्यात मदत करणे.
६.प्रदुषणाला आळा घालण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षाची रोपटे लावणे व त्याचे संवर्धन करणे.
७.शैक्षणिक साहित्य व सार्वजनिक मालमत्ता यांची नासधूस होणार नाही याकडे लक्ष देणे.

८.अन व पाण्याची नासाडी टाळण्याची दक्षता घेणे.
९.स्वत:च्या हक्कांपेक्षा स्वत:ची. कर्तव्ये समजून घेऊन त्यांचे निष्ठेने पालन करणे.
१०.वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता पाळून आपला देश आरोग्यसंपन्न व बलवान बनविण्यास मदत करणे.
११.खनिज पदार्थांचा काटकसरीने वापर करुन शक्य तेथे सौरऊर्जाशक्तीचा वापर करणे.
१२.समाजात स्त्रियांना पुरुषांइतकेच सन्मानाने वागणूक देऊन स्त्रिशिक्षणाकडे लक्ष देणे.
१३.वन्य प्राण्यांचे रक्षण करणे.
१४.अंधश्रद्धा व अज्ञान दूर करुन वैद्यानिक दृष्टीकोन अवलंबिणे.
१५.खेळ, व्यायाम व आहार यांचा समतोल साधणे.
१६.आपल्याला इतर राष्ट्रांबरोबर पूढे जायचे आहे हे लक्षात ठेवून एकविसाव्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरुन झपाट्याने वाटचाल करणे.

वरील गोष्टी ह्या लोकसंख्या शिक्षणाची जाणीव करुन देतात. त्यातूनच लोकसंख्या शिक्षणाची उद्दिष्टे गाठणे आपल्याला शक्य होईल.

अशाप्रकारे नागरिकाने राष्ट्रीय व सामाजिक समस्यांशी समरस झाले पाहीजे. त्याला सामाजिक बांधीलकीची जाणीव असली पाहिजे. सामाजिक समस्यांची चिकित्सा व उकल करण्यासंबंधीचे मार्ग शोधून काढले पाहीजेत. लोकसंख्येचा विस्फोट ही आजची राष्ट्रीय समस्या आहे. या समस्येचे गांभीर्य ओळखून त्याची उकल करण्याचे प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण यातूनच आपण आपले खरे नागरिकत्व बजावू शकू तसेच भावी पीढीच्या नागरिकांना असे मार्गदर्शन करु शकू त्यासाठी लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे.

संदर्भ ग्रंथ :–

१. लोकसंख्या शिक्षण :– राज्य शिक्षणशास्त्र संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे ३०, १९८२
२. प्राचार्य डॉ.अहिरे बा.ग. :– लोकसंख्या शिक्षण, नित्यनूतन प्रकाशन — २००६.
प्राचार्य डॉ. बोंदार्डे कै.मु.
३. आगलावे डॉ.प्रदिप :– भारतातील सामाजिक समस्या
आगलावे डॉ.सरोज श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, जुलै—२०१८
४. लोटे रा.ज.व :– भारतीय सामाजिक समस्या
चौहान डॉ.ए.डी पिंपळापुर ॲण्ड कं.पब्लिशर्स, नागपुर जुन—२०१८

IQAC Co-ordinator
Late Pushpadevi Patil Arts & Science College, Risod Dist.Washim-444506

Late Pushpadevi Patil Arts & Sci. College 722 Dist-Washim Risod

Principal
Late Pushpadevi Patil Arts & Science College Risod Dist-Washim